सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध

# श्रीगुरुदेवदत्त

## आपली जिथे श्रद्धा असेल त्या सगुण प्रतीक अथवा आपल्या सद्गुरूंमध्ये श्रीदत्तात्रेयांच्या अस्तित्वाचे आरोपण अपेक्षित असते. त्या श्रद्धेने केलेली साधना ही त्या साधकाला आत्मतत्त्वप्राप्तीच्या अंतिम धेयापर्यंत निश्चितच पोहोचवते. येत्या एक डिसेंबर रोजी दत्तजयंती आहे. त्यानिमित्त्याने...

भगवान श्रीदत्तात्रेय अथवा अवधूत यांचा अवतार वस्तुत: अतिप्राचीन काळी निर्माण झाला. तसे उल्लेख स्कन्दपुराणासारख्या प्राचीन समजल्या जाणाऱ्या पुराणांतून आढळतात, परंतु त्यांच्या तीन शिरे सहा हात' अशा प्रतिमेचा प्रसार त्यामानाने अलीकडच्या काळात तत्कालीन समाजाला एकसंध करण्याच्या उद्देशाने झाला असं इतिहास सांगतो. महाविष्णू, प्रजापिता ब्रह्मा आणि भगवान शंकर या तीन ईश्वरी प्रतीकांची निर्मिती अनुक्रमे सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण या तीन गुणांची तीन कार्ये साकारणाऱ्या ईश्वराची आराधना करण्याच्या उद्दिष्टाने ज्ञानपूर्वक चिंतन करून करण्यात आली. मात्र कालांतराने प्रत्येक प्रतीकाची आराधना करणाऱ्या साधकांचे स्वतंत्र पंथ निर्माण झाले व दुराभिमानामुळे या प्रत्येक पंथामध्ये श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी द्वंद्व सुरू झाले. अद्वैत वेदांताच्या प्रचार आणि प्रसारामुळे या प्रतीकांमधील एकात्मता सामान्य हिंदूंमध्ये रुजवायला काही प्रमाणात मदत झाली असली तरी विविध पंथीय आणि सांप्रदायिक भक्तांना एकत्र आणण्याचे कार्य घडले ते श्रीदत्तात्रेय या ईश्वरी प्रतीकामुळे! आज श्रीदत्तात्रेयांची आराधना तळागाळातल्या भक्तांपासून ते योगशास्त्रनिपुण उच्चविद्याविभूषित अशा सर्व साधकांमध्ये केली जाते.

'त्रिगुणात्मक' असूनही 'त्रिगुणातीत' अशी श्रीदत्तात्रेयांची प्रतिमा संपूर्ण दोषरहित अशी आहे, कारण या प्रतिमेमध्ये सत्त्व, रज आणि तम अशा त्रिगुणांचा समतोल,ज्याला इंग्रजीमध्ये 'परफेक्ट हार्मनी' म्हणता येईल असा साधला गेला आहे. यातल्या कोणत्याही गुणाचं मर्यादेबाहेर अधिक्य झालं तर मनुष्याला व्यावहारिक आणि आध्यात्मिक अशा दोन्ही स्तरांवर यश प्राप्त करता येत नाही. तिन्ही गुणांचा जेव्हा समतोल साधला जातो तेव्हाच त्यांच्या पलीकडे असलेल्या त्रिगुणातीत अशा एकमेव वैश्विक शक्तीचं आकलन होतं. सारांशाने 'त्रिगुणात्मक आणि त्रिगुणातीत' अशी सकृतदर्शनी विरोभास दर्शवणारी अवस्था श्रीदत्तात्रेयांच्या सगुण भक्तीमुळे मनुष्याला प्राप्त होऊ शकते. मग काही विशिष्ट प्रसंगी, आवश्यकतेनुसार यातील एखाद्या गुणाचा शक्तीयुक्त आविष्कार घडवणे आणि तसा आविष्कार घडवूनही स्वत: त्यापासून अलिप्त राहणे ही किमया 'त्रिगुणात्मक-त्रिगुणातीत' अशा अवस्थेमुळे साध्य करता येते. अशी अवस्था साध्य करण्याचा उपदेश सत्त्वगुणांच्या आधिक्यामुळे गलितगात्र झालेल्या अर्जुनाला भगवान श्रीकृष्णांनीसुद्धा श्रीमद्भगवद्गीतेद्वारे दिला होता.

परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांनी रचलेल्या श्रीदत्तात्रेय स्तोत्रामध्ये दत्तात्रेयांना स्मर्तृगामी असं विशेषण दिलं आहे.

दत्तात्रेयं महात्मानं वरदं भक्तवत्सलं
प्रपन्नार्तिहरं वंदे स्मर्तृगामी स माऽवतु॥१॥

'शरणागतांचं दु:ख दूर करणारा, आपल्या भक्तांवर प्रेम करणारा, त्यांना इष्ट वर देणारा अशा उदार मनाच्या अत्रिपुत्र दत्तात्रेयांना नमस्कार असो! स्मरण करताक्षणीच ज्याचे आगमन होते, तो दत्तात्रेय आमचे रक्षण करो. स्मर्तृगामी म्हणजे स्मरण करताच हजर होणारा! जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी अशा सर्व ठिकाणी चिरंतन अशी दत्तात्रेयरूपी वैश्विक शक्ती भरलेली आहे. त्यामुळे भक्ताने स्मरण करताच ती शक्ती अवतीर्ण होणार यात तीळमात्र शंका नाही.

'अहं तुभ्यं मया दत्त:।' म्हणजेच, ''मी तुम्हाला स्वत:ला देतो,' असं वरदान देऊन महर्षी अत्री आणि देवी अनसुयेच्या पोटी श्रीदत्तात्रेय नामक वैश्विक शक्ती अवतीर्ण झाली. अत्री ऋषींपासून निर्माण झालेला तो आत्रेय. 'त्रि' म्हणजे तीन. हिंदुस्थानी संस्कृतीमध्ये या तिनांच्या त्रिपुटीला अतिशय महत्त्व आहे. जीव-जगत-जगदीश्वर ही त्रितत्त्वे, सत्त्व-रज-तम हे त्रिगुण, वात-पित्त-कफ हे त्रिदोष, भूत-भविष्य-वर्तमान हे त्रिकाळ, स्वर्ग-मृत्यू-पाताळ हे त्रिलोक अशा कित्येक त्रिपुटींच्या अधिग्रासांच्या अतीत असणारा तो अ-त्री. या अत्रीचा जेव्हा असूयाविरहित अनसूयानामक वृतीशी संयोग होतो तेव्हा निर्माण होतो तो जगतकल्याणकारी दत्तात्रेय! म्हणजेच, त्रिगुणांमध्ये अडकलेल्यांना त्रिगुणातीत होण्याचा मार्ग दाखवणारे सद्गुरुतत्त्व होय! जसं मंगलमूर्ती म्हटलं की, त्याला जोडून 'मोरया' हाच शब्द अभावितपणे येतो तसं श्रीगुरुदेव असं म्हटलं की, 'दत्त' या शब्दाशिवाय दुसरा कुठलाही शब्द मुखात येत नाही इतकं ऐक्य गुरुतत्त्व आणि दत्तात्रेय प्रतीक यांच्यामध्ये आहे. हिंदुस्थानातील समस्त गुरुपरंपरेचे आद्य सद्गुरू म्हणून श्रीदत्तात्रेयांना वंदन करण्यात आलेलं आहे.

वस्तुत: प्रत्येक मनुष्याचा उत्तम गुरू हा त्याचा आत्माच असतो. प्रत्येकात अवस्थित असलेले हे आत्मतत्त्व वस्तुत: अपरिमित ज्ञानाने परिपूर्ण असते. केवळ आपल्या अनुराग-द्वेषादी चित्तमालिन्यामुळे हे ज्ञान जणू कंदिलाच्या काचेवर काजळी धरावी तद्वत झाकोळले जाते. त्या अपुऱ्या प्रकाशात जीवनाचा रस्ता दिसत नाही, मार्ग समजत नाही. मानवी डोळ्यांना ज्याप्रमाणे सर्वात जवळची गोष्ट दिसत नाही, त्याप्रमाणे आपल्याचपाशी असलेले हे आत्मरूपी गुरुतत्त्व आपल्यालाच समजत नाही. या मानवी मर्यादेतच सगुण प्रतिमांच्या निर्मितीचे रहस्य दडलेले आहे. साधकाची या प्रतीकांप्रति जेवढी श्रद्धा अधिक तेवढेच त्याचे आत्मशोधनाचे प्रयत्न अधिक फलदायी असतात. कुठल्याही प्रतीकाचा आधार न घेणाऱ्या ज्ञानमार्गी साधकाचीसुद्धा स्वबळावर निष्ठा असावी लागते. तात्पर्याने श्रद्धेला पर्याय नसतो.

कित्येक वैज्ञानिक सिद्धांत हे प्रथम संशोधकांच्या मनातच उगम पावले, परंतु तेसुद्धा आपल्या ध्येयप्राप्तीसाठी त्यांनी अखंड चिंतन केले तेव्हाच. त्यांच्या त्या चिंतनातही समाजसेवेचा व्यापक हेतू सामावलेला होता आणि निसर्गाबाबत आश्चर्ययुक्त अहंशून्यता होती. म्हणूनच निसर्गाने आपली कित्येक रहस्ये त्यांना उलगडून दाखवली.

प्रत्येक भक्तीची परिणती ही आत्मतत्त्वाच्या ज्ञानातच होते, नव्हे तेच अपेक्षित आहे. समस्त गुरुपरंपरेचे निदर्शक असलेल्या श्रीदत्तात्रेयांच्या प्रतिमेची सद्गुरू रुपातील उपासना ही साधकाच्या पारलौकिक प्रगतीसाठी सहाय्य करते. त्यासाठी ''सगुणाचेनि आधारें। निर्गुण पाविजे निर्धारें।'' (दासबोध ६.६.५५)

याप्रमाणे आपली जिथे श्रद्धा असेल त्या सगुण प्रतीक अथवा आपल्या सद्गुरूंमध्ये श्रीदत्तात्रेयांच्या अस्तित्वाचे आरोपण अपेक्षित असते. त्या श्रद्धेने केलेली साधना ही त्या साधकाला आत्मतत्त्वप्राप्तीच्या अंतिम धेयापर्यंत निश्चितच पोहोचवते.

॥ अवधूत चितन श्रीगुरुदेवदत्त ॥

(वासुदेव वामन बापट गुरुजी ओम सद्गुरू प्रतिष्ठानच्या बदलापूर, बोरिवली आणि खोपोली स्थानांवर गुरुपदी विराजमान आहेत. संपर्क -bhende@indiatimes.com)

- बापट गुरुजी